PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 1, ISSUE 4

# सार्क संघटनेपुढील आव्हाने

**प्रा. बोडके पी. आर.**
राज्यशास्त्र विभाग
संशोधक विद्यार्थीनी
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड
महाराष्ट्र भारत

दक्षिण आशियातील देशामध्ये परस्पर सहकार्याच्या माध्यमातुन सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने दक्षिण आशियायी प्रादेशिक सहकार्य संघटनेची (सार्क) स्थापणा करण्यात आल्याचे दिसुन येते. या संघटनेत समाविष्ट आठ देशांतील अर्थव्यवस्थेचा विचार केला तर ही जगातील तिसरी आर्थिक शक्ती ठरु शकते. अमेरिका आणि चीन नंतर तिसरी आर्थिक महासत्ता म्हणुन विभागीय सहकार्याच्या माध्यमातुन सार्क देश आपली ओळख निर्माण करु शकतात. या जाणीवेतुन बांग्लादेशाच्या पुढाकाराने सार्कचीस्थापणा करण्यात आली. जागतीक पातळीवर युरोप मध्ये स्थापण झालेल्या विभागीय संघटनांच्या पार्श्वभूमीवर स्थापित सार्कला ३० वर्ष उलटुन गेली आहेत. या माध्यमातून सार्क सदस्य राष्ट्रांतील जनतेला एक व्यासपीठ मिळाले आहे. सार्क एकात्मिक कृती कार्यक्रमांतर्गत बहुविध क्षेत्रात सहकार्याच्या संधी निर्माण झालेल्या आहेत. देशांच्या आर्थिक बाबतीत विचार करता विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यटन आणि सुरक्षेच्या दृष्टीने या देशातील सहकार्याचे एक नवे पर्व सार्कच्या माध्यमातुन सुरु झाले. मात्र सार्क स्थापनेतील या सकारात्मक बाबींचा विचार करता या संघटनेच्या वाटचालीत निर्माण होत असलेली आव्हाने ही विचारांत घ्यावी लागतील. ही आव्हाने केवळ वैचारीक पातळीवर नाहीत तर, संबंधीत देशातील सामाजिक परिस्थिती, या देशाची आर्थिक स्थिती व या सदस्य देशांचे आपसांतील संबंध अशा अनेक दृष्टीने आव्हानांचा विचार करावा लागेल.

सार्क संघटनेच्या स्थापनेनंतर जागतीक पातळीवर अनेकांनी या संघटनेपुढील आव्हाने आणि त्याच्या वाटचालीवर टीकात्मक टिपण्णी केली असल्याचे दिसुन येते. तत्पूर्वी जेकब विनर यांनी सर्वप्रथम अशा विभागीय संघटनांची परिणामकारकता अभ्यासुन भाष्य केले होते. जेकब विनर यांच्या मतानुसार " अशा विभागीय संघटना स्थापन होवुन व्यापाराच्या संधी निर्माण झाल्या आणि व्यापाराची व्याप्ती वाढली तर आपोआपच सर्वार्थाने विकास व कल्याणाचे मार्ग मोकळे होतील.", बलसा (१९६१) यांच्या मते, " अशा संघटनेच्या माध्यमातून परस्पर विकास तेव्हाच शक्य आहे जेव्हा राष्ट्रीय आर्थिक धोरणाची आखणी सहिष्णुतेच्या आधारे केली जाते व व्यापारासाठी एखादया देशाने आखुन घेतलेल्या मर्यादा संपवल्या जातात. पिंडर (१९६८) यांनी देशाच्या विभागीय संघटना स्थापण केल्या जात असताना दोन देशांतील आर्थिक मुद्दावंरील वाद किंवा मतभेद मिटवूनच एकत्र येण्याची गरज, प्रतिपादन केली. सार्कची स्थापना झाल्यानंतर १९८७ मध्ये अहसान अब्दुल यांनी एका शोधनिबंधात सार्कच्या स्थापनेनंतरचे वास्तव्य स्पष्टपणे मांडले आहे. त्यात ते म्हणतात, सदस्य देशांत असलेल्या मतभेदाच्या पार्श्वभूमी सार्कची स्थापणा अखेर झाली असली तरी

आर्थिक आणि सामाजिक सहकार्याच्या मुद्दयांवर या संघटनेच्या स्थापनेमागील उद्दिष्टे कितपत साध्य होतात, हे आगामी काळात पहावे लागेल. एकुनच जागतीक पातळीवर विविध देशांनी, स्थापण केलेल्या विभागीयी संघटनांची वाटचाल जेवढी सकारात्मक वाटते तेवढीच आव्हानात्मक असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सार्क समोर असलेल्या विविध आव्हानाचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल-

१) साफ्टा (SAFTA ) अंतर्गत मुक्त व्यापार व गुंतवणुकीची जलद अंमलबजावणी करणे व यासाठी प्रगत प्रादेशीक संपर्क सुविधा उपलब्ध असणे व राष्ट्रांमधील तणाव व अविश्वास दुर करणे गरजेचे आहे.

२) सार्क सदस्य राष्ट्रातील सीमाविषयक वादाचा दहशतवाद्यांचा, लोकहिताशी संबंधीत धोरणे कार्यक्रम आणि आर्थिक एकीकरणाच्या प्रक्रियेवर दुष्परिणाम होणार नाही याची खबरदारी सदस्य राष्ट्रांनी घेणे आवश्यक आहे पण तसे होताना दिसत नाही.

३) सार्क सदस्य राष्ट्रातील व्यापार वृद्धीसाठी नव्या सुधारणांची गरज निर्माण झाली आहे. या देशांतील कठोर कामगार, कायदे, मालमत्तांच्या मालकी संदर्भात असलेले तकलादू कायदे आणि अकार्यक्षम कर विभाग या बाबी पण या देशांतील व्यापार वाढीसाठी अडसर ठरत आहेत.

४) सार्क देशांनी व्यापारी क्षेत्रात सहकार्य वाढीस लागावे म्हणुन सातत्याने प्रयत्न करीत विविध करार केले असले तरी प्रत्यक्षात या व्यापार वाढीला चालना देण्यात अजुनही मोठया प्रमाणात यश आलेले नाही. याची कारणे संबंधित देशांतील धोरणे आणि राजकीय इच्छाशक्तींशी निगडीत असल्याचे दिसुन येते.

५) दक्षिण आशियाई विभागाचा विचार करता असे दिसुन येते की, सार्क देशांनी अंतर्गत व्यापारवाढीसाठी चांगले. प्रयत्न चालवले असले तरी आंतरविभागीय अर्थात जागतिक बाजारपेठांशी संपर्क वाढवण्यात हे सार्क देश कमी पडत आहेत. आंतरविभागीय अर्थात सार्क देशाबाहेरील इतर देशांशी व्यापारी संबंध प्रस्थापीत करुन गुंतवणुक व आर्थिक विकासाची नवी साखळी निर्माण करण्यात सार्क देशांना अपेक्षीत यश प्राप्त झालेले नाही. संरक्षण विषयक तज्ज्ञ सुशांत सरीन यांच्या मते, “ अजुनही सार्कच्या स्थापनेनंतर मुळ उद्दिष्टांचा विचार करता म्हणावे तसे यश आलेले नाही. त्यांच्या मते सार्क विद्यापीठाची स्थापना सोडली तर दुसरा कोणताही मोठा प्रकल्प सार्कच्या माध्यमातुन पुर्ण होऊ शकलेला नाही.

६) सार्क समोर असलेल्या आव्हानामध्ये सदस्य राष्ट्रांपैकी बहुतांश राष्ट्रे आर्थिक उत्पन्नाच्या बाबतीत पाश्चात्य राष्ट्रांवर अवलंबून आहेत हे परावलंबीत सार्कच्या यशस्वी वाटचालीच्या दृष्टीने एक अडसर ठरत आहे. विशेष म्हणजे या सार्क सदस्य राष्ट्राची अन्नधान्य, तंत्रज्ञान

किंवा अन्य कोणत्याही क्षेत्रात भारतावर आपण अवलंबुन नसावे ही भावना असल्याने सार्क सदस्य देशांतील सहकार्यावर यांचा परिणाम होत असल्याचे दिसुन येते.

७) दक्षिण आशियामध्ये गरिबी निर्मुलन ही एक मोठी समस्या आहे. १२ व्या सार्क शिखर परिषदेत या मुद्यांवर या देशांनी विशेष लक्ष केंद्रीत केले गरिबी निर्मुलनार्थ स्थापण करण्यात आलेल्या स्वतंत्र दक्षिण आशियाई आयोगाचे निश्चित केलेले लक्ष गाठण्याच्या दृष्टीने परिणामकारक उपाययोजना करण्याचे या परिषदेमध्ये निश्चीत करण्यात आले. मात्र हे लक्ष्य गाठण्याच्या दृष्टीने सार्क देशांना अजुनही पुरेसे यश आल्याचे दिसुन येत नाही.

८) दक्षिण आशियातील उच्च शिक्षण समस्या आणि आव्हाने या विषयांवर मुंबईत आयोजीत आंतरराष्ट्रीय परिषदेत याविषयी सार्क देशांतील शिक्षणतज्ज्ञांनी यावर केलेले टिकात्मक भाष्य. या अनुषंगाने महत्वाचे ठरते. दिल्लीतील राष्ट्रीय शिक्षण व प्रशासन विद्यापीठांच्या शैक्षणिक वित्तसहाय्य विभागाचे प्रमुख बी.जी. टिळक यांनी या परिषदेत म्हटले की, ‘सार्क’ देशातील उच्च शिक्षणासमोर असलेल्या अडचणीत गुणवत्तेचा अभाव हे एक प्रमुख आव्हान आहे.

९) सार्क देशांमध्ये दहशतवादी कारवाया ही एक अत्यंत गंभीर समस्या आहे, विशेषतः पाकिस्तानमधील दहशतवादी संघटनांच्या जगभरातील कारवायांमुळे हा दहशतवाद केवळ सार्क सदस्य देशातच नव्हे तर जगासमोर एक आव्हान ठरले असल्याचे दिसुन येते.

१०) सार्क देशांदरम्यान परस्परांशी असलेले सौहार्दपूर्ण संबंध ही एक मोठी समस्या असल्याचे दिसुन येते.

११) सार्क सदस्य देशांच्या अंतर्गत समस्यांचा सार्क देशांच्या परस्पर सहकार्यावर मोठा परिणाम होत असल्याचे दिसुन येते.

१२) चीनचा सार्क संघटनेत प्रवेश हे एक आव्हान पुढे येत आहे.

१३) व्हिसा धोरणांतील अडचणी

१४) भेदभावाची मानसिकता

१५) माहितीचा व कुशल मनुष्यबळाचा अभाव

१६) निधीचा अभाव

१७) भारताबद्दल भीती –

१८) कायम स्वरुपी सुरक्षा व्यवस्थेचा अभाव :-

भारत हा या विभागातील भौगोलिक व लोकसंख्येच्या दृष्टीने विचार करता मोठा देश आहे. विभागातील अर्थव्यवस्थेचा विचार करता ७३ टक्के अर्थव्यवस्था एकटया भारताने व्यापलेली आहे. तसेच ७७ टक्के लोकसंख्या एकटया भारतात आहे. त्यामुळे साहजिकच उत्पादन, वितरण, सेवा आणि मनुष्यबळामध्ये भारताची क्षमता इतर सार्क देशांपेक्षा अधिक आहे. भारताची ही क्षमताच सार्कच्या इतर सदस्य देशांच्या मनात भीती निर्माण करणारी ठरत आहे. भारत आपल्या उत्पादनांची भरमसाठ निर्यात करुन आपल्या देशाला डम्पिंग ग्राऊंड म्हणुन वापरेल अशी भीती सदस्य राष्ट्रांच्या मनात घर करुन आहे

अशाप्रकारे सार्क संघटनेपुढील (आव्हाने) आव्हानांचे निराकरण करणे गरजेचे आहे.

प्रामुख्याने या आव्हानावर मात करायची असेल तर सदस्य देशांतील परस्पर संबंध सलोख्याचे असायला हवेत. या देशांदरम्यान असलेले वादग्रस्त मुद्दे वर्षाणूवर्षे कायम आहेत. या वादग्रस्त प्रश्नांची उकल होणे गरजेचे आहे. यासाठी सर्व सदस्य राष्ट्रांनी एकत्रीत प्रयत्न केले पाहिजेत या प्रयत्नांना प्रामाणिकपणाची जोड ही असायला हवी.

## संदर्भ ग्रंथ

1) Jacob Viner, New York, Carnegie Endowmeat for International Peace 1950 viii 22
2) Bhushan K and Katyal G, SAARC: Challenges before New Millennium, A.P.H. Publishing Corporation New Delhi 2002.
3) सुशांत सारिन, सार्क मकसद और चनौतियाँ, प्रभात खबर, २६ मे २०१४.
4) पुष्परंजन, सार्क का दायरा और चीन की चुनौती, जनसत्ता,
5) E. Sudhakar, SAARC- Origin, Growth and Future ,Gyan Publishing House, New, Delhi 1987
6) तुलनात्मक राजकारण आणि आंतरराष्ट्रीय संबंध, राजयशास्त्र ऐच्छीक पेपर २, डायमंड पब्लिकेशन, पुणे २०१०,
७) अरुणा पेंडसे, उत्तरा सहस्त्रबुद्धे, आंतरराष्ट्रीय शीत युद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण, ओरिअंट ब्लॅकस्पॉन प्रा.लि. मुंबई

८) स्टडी सर्कल चाणक्य मंडळ, मासिक अंक

९) दै. महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, सकाळ, लोकमत, समाचार इ मधील लेख

१०) इंटरनेटवरील माहिती

११) साप्ताहिक साधना, समाज प्रबोधन पत्रिका मधील लेख

१२) डॉ. शैलेंद्र देवनाळाकर, भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतर प्रतिमा प्रकाशन, पुणे २००७